अर्ज औविका क्रं ५/२०२४
निशाणी यु—७

<u>**उलटतपासणी विधिज्ञ श्री. एस. एम. खत्री, प्रतिवादींकरीता.**</u>

**२)** मला आतापर्यंत कोणतीही रक्कम मिळालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी थकीत वेतनाची रक्कम रु. १२,६१,६७०/— ही कशी तयार करण्यात आली त्याचा हिशोब आणि गृहीतक मी मांडलेले नाही. (अर्जदार स्वत: सांगतात की, ही रक्कम माझे शेवटच्या वेतनाच्या अनुषंगाने मी नमुद केलेली आहे.) माझे शपथपत्रात आणि अर्जामध्ये असे कुठेही नमुद केलेले नाही की, माझे शेवटचे वेतन अमुक एवढे होते आणि त्यामुळेच उपरोक्त रक्कम रु. १२,६१,६७०/— ही थकीत रक्कम म्हणुन तयार होते. मी प्रतिवादींकडे रु. १२,६१,६७०/— माझी बाकी निघते यासंदर्भात मी मागणीपत्र/अर्ज प्रतिवादींकडे माझे कथनानुसार दिले होते परंतु अभिलेखावर मी कोणतेही अर्ज वा मागणीपत्र दाखल केलेले नाहीत.

**३)** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींविरुध्द न्यायालयीन आदेशाचा अवमान झालेला आहे म्हणुन मी याच न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला हयाची पुर्ण कल्पना आहे की, माझे कथनाप्रमाणे तथाकथीत रक्कम प्रतिवादींनी शासनाकडे मागितलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मागणी करुन देखील प्रतिवादींकडे तथाकथीत रक्कम आलेली नसल्यामुळे मला देण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे अर्जामध्ये मोघमपणाने उपरोक्त रकमेची मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मागणी पुर्णपणे चुकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, मा. औद्योगिक न्यायालयाने २०१८ मध्ये निकाल पारीत केल्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण या न्यायालयात २०२४ मध्ये दाखल करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतच्या विलंबाचे कारण अर्जात आणि शपथपत्रात नमुद करण्यात

आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ जास्तीचे व्याज मिळण्याकरीता मी हे प्रकरण विलंबाने दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा अर्ज खोटा असुन मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**

**सरतपास नाही.** श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

स्वा/—
(शा. श. जहागिरदार)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, बुलढाणा.

ठिकाण :— बुलढाणा.
दि. :— १२/०८/२०२५